नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २८/०३/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## जबरी संभोग

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :-** दिनांक २७/०३/२०२२ चे ०९:३० वा. चे सुमारास फिर्यादी हे डयुटी वरून घरी परत आले असता त्यांची मुलगी/पीडिता वय ९ वर्ष हिने सांगीतले की, अंदाजे ०९.०० वा. दरम्यान ती खेळत असतांना आरोपी नामे- अरविंद कामेश्वर रजवाड, वय २४ वर्ष, रा. तुलसीखाल पो कामगारपुर ह.मु इंडोरामा कंपनी गेट नं १ एमआयडीसी बोरी हा तिथे आला व पीडितेला बळजबरीने लैंगिक अत्याचार केला. तेव्हा तिचा भाउ व मैत्रीन यांनी पीडितेला ओढले तेव्हा तिने सर्व पप्पाला सांगणार असे म्हटले तेव्हा आरोपी पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (अ), (ब), भादंवि. सहकलम ३ (ड)/४, ५ (एम), ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे मो.क्र. ८३५५९४७४७६ या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. सावनेर :-** अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा पंधराखेडी शिवार शेत येथे दिनांक २६/०३/२२ चे २०.०० वा. ते दिनांक २७/०३/२२ चे ०७.०० वा. दरम्यान **अंकुशराव किसना भोंगाडे (मृतक), वय ५२ वर्षे, रा. वार्ड क्र ३ पंधराखेडी** हा नेहमी दारू पिण्याच्या सवईचा असून तो नेहमी प्रमाणे दि २६.३.२०२२ रोजी रात्री २०.०० वा. शेतात जागणी करीता गेला होता. तो सकाळी घरी परत न आल्याने त्याचा मुलगा आशिष त्याला शेतात पाहण्यासाठी गेला असता तो शेतात मृत अवस्थेत दिसला. त्याचा नाकातोंडातून फेस निघत होता व त्याचा जवळ विषारी औषधाची बाटली पडलेली होती. त्याने दारू पिवून दारू चा नशेत विषारी औषध प्राशन करून मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- आशिष अंकुशराव भोंगाडे, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र. ३ पंधराखेडी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार संदीप नागरे मो.क्र. ९०११५९६५०० हे करीत आहे.

# गळफास लावून मृत्यू

**पो.स्टे. बेला :–** अंतर्गत २५ कि.मी. महालगाव वार्ड क्र ०१ येथे दिनांक २६/३/२२ चे १८.०० वा दरम्यान **संदिप उर्फ गजानन रमेश देवताळे (मृतक), वय २६ वर्षे, रा. महालगाव वार्ड क्र. ०१** याचा ०७ महीण्यापुर्वी अपघात झाला होता. त्या अपघातात त्याचा उजवा पाय फॅक्चर झाल्याने पायाचे दोन ऑपरेशन झाले होते. ऑपरेशन होवुन सुध्दा त्याला चालता येत नव्हते. त्यामुळे त्याला नैराषय आले होते. त्यांनी कोणी घरी नसल्याचे संधी पाहुन स्वताचे राहते घरी स्लॅप ला लागलेले लोखंडी हुकला नायलोन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ग.भा. लिलाबाई रमेश देवतळे, वय ४५ वर्ष, रा. महालगाव वार्ड क्र. १ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार आदमने ९८९०३२१९४० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**